AROTE Dental Clinic smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon) Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 सोमवार, दि. ३० मार्च २०२६

दशरथ चव्हाण मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १२० | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# 'दुबई आणि अबू धाबी उद्ध्वस्त होतील'

## अमेरिकन अर्थतज्ज्ञाचा UAE ला गंभीर इशारा; इराण युद्धावरून मोठे विधान

मुंबई : (समर्थ गांवकरी)

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात गेल्या काही दिवसांपासून संघर्ष सुरू आहे. या संघर्षाची झळ मध्यपूर्वेतील देशांसह जगभरात बसताना पाहायला मिळत आहे. यादरम्यान अमेरिकेचे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांनी एक महत्त्वाचे विधान केले आहे. इराणबरोबर सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इस्रायलची बाजू घेऊन संयुक्त अरब अमिराती (UAE) मोठी चूक करत असल्याचे सॅक्स म्हणाले आहेत. जर यूएईने या संघर्षात उतरण्याचा निर्णय घेतला, तर दुबई आणि अबू धाबी यांसारखी त्यांच्या प्रमुख शहरांवर बॉम्बफेक होण्याचा धोका असल्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे. अमेरिकन अर्थतज्ज्ञ सॅक्स म्हणाले की, दुबई आणि अबू धाबी हे काही 'मिलीटरी झोन' नाहीत तर प्रमुख पर्यटन स्थळे आहेत, जेथे श्रीमंत लोक हे विश्रांती आणि मौजमजेसाठी येतात. युद्धात प्रवेश केल्याने त्यांच्या शहरांना लक्ष्य केले जाऊ शकते, असेही ते पुढे बोलताना म्हणाले.

फायनान्शिअल टाइम्सच्या रिपोर्टनुसार, यूएईने अमेरिकेसह आपल्या इतर मित्र राष्ट्रांना कळवले आहे की, होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या 'मल्टिनॅशनल मॅरिटाइम टास्क फोर्स' मध्ये सहभागी होण्याची त्यांची तयारी आहे. होर्मुझची सामुद्रधुनी या आखाती देशांतील महत्त्वाच्या जलमार्गातून जहाजांचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी एक आघाडी उभी करण्यासाठी यूएईकडून प्रयत्न केले जात आहेत. "मुळात, जर यूएई या युद्धात उतरले तर दुबई आणि अबू धाबी उडवून दिले जाऊ शकतात. ही रिसॉर्ट्सची ठिकाणे आहेत. ही पर्यटन स्थळे आहेत. ही काही तटबंदी असलेली मिसाईल डिफेन्स क्षेत्र नाहीत. ही अशी ठिकाणे आहेत जिथे श्रीमंत लोक पार्ट्या करण्यासाठी आणि पैसा गुंतवण्यासाठी जातात. अशा परिस्थितीत युद्धात उडी घेणे म्हणजे दुबईसारख्या



ठिकाणांच्या मूळ उद्देशाच्या विरोधात जाण्यासारखे आहे. अमिरातीने डोळे उघडे ठेवून स्वतःला एका विचित्र अडचणीत पाडून घेतले आहे आणि ते यात अजून भर घालत आहेत," असे सॅक्स एएनआयशी बोलताना म्हणाले. अमेरिकेचे भागीदार होण्यासाठी Abraham Accords वर स्वाक्षरी करणे ही यूएईसह इतर आखाती देशांची मोठी चूक आहे असेही सॅक्स पुढे बोलताना म्हणाले. परकीय धोक्यांपासून संरक्षणासाठी अमेरिकेवर अवलंबून राहण्यापेक्षा, स्वतःच्या संरक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला सॅक्स यांनी यावेळी यूएईला दिला आहे.

"माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढला जाऊ नये, पण, आम्ही दुष्ट इराणी लोकांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेमध्ये सामील होणार आहोत आणि अमेरिकेत ट्रिलियन्स डॉलर्सची गुंतवणूक करण्याची आमची वचनबद्धता पाळत राहू, ही कालची घोषणा अत्यंत भोळेपणाची आहे. पुरे करा. आता स्वतःचे संरक्षण करा. परिस्थिती समजून घ्या. तुम्हाला खरेच वाटते का, की या क्षणाला एक तोट्याचा निर्णय असूनही त्यावरच भर देणे हा पुढे जाण्याचा योग्य मार्ग आहे? पण ते सध्या नेमके तेच करत आहेत," असे सॅक्स यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात...

### सुनेत्रा पवारांची भावनिक पोस्ट

मुंबई (समर्थ गांवकरी) : अजित पवारांच्या निधनाला दोन महिने पूर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या पत्नी आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अत्यंत भावूक पोस्ट लिहिली आहे. "काळ पुढे सरकतोय, पण मन अजूनही तुमच्याच आठवणींमध्ये गुंतले आहे. तुम्ही केवळ एक नेते नव्हता, तर आधारस्तंभ होता," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अजितदादांची कामाची झपाटलेली वृत्ती कायम मार्गदर्शन करेल, असेही त्या म्हणाल्या.

### सुषमा अंधारेंचा चाकणकरांवर वार

मुंबई (समर्थ गांवकरी) : अशोक खरात प्रकरणानंतर रुपाली चाकणकर यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षपदापाठोपाठ आता राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा दिला आहे. यावर शिवसेना (उबाठा) नेत्या सुषमा अंधारे यांनी खोचक टीका केली. "हा राजीनामा नाही, तर गच्छंती आहे," असे म्हणत त्यांनी चाकणकरांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. खरात प्रकरणामुळे झालेल्या राजकीय चिखलफेकीनंतर चाकणकरांना पक्षातून बाजूला केल्याची चर्चा आता सुरु झाली आहे.

### "संघर्ष अखेरपर्यंत चालू राहील"

मुंबई (समर्थ गांवकरी) : आमदार रोहित पवार यांनी अजितदादांच्या अपघाताप्रकरणी तपासासाठी कंबर कसली आहे. "आठवणींचे 2 महिने.. ये प्यार और संघर्ष आखिर तक चलता रहेगा," असे म्हणत त्यांनी दादांच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या गोष्टींचा शोध घेण्याचा निश्चय व्यक्त केला. रोहित पवार सध्या या प्रकरणातील पुरावे आणि कागदपत्रे सीआयडी (CID) कडे सोपवत असून गुन्हेगारांना शिक्षा मिळवण्यासाठी आग्रही आहेत.

# नाशिक पोलीस आयुक्तालय राज्यात प्रथम; १५० दिवसांचा ई-प्रशासन उपक्रम



### जिल्हा परिषदेचाही गौरव

ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरीबद्दल नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांचा सन्मानपत्रक देऊन गौरव करण्यात आला. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यात आले. सात निकषांत उत्कृष्ट कामगिरी करत नाशिक जिल्हा परिषदेने एकूण १६५.७५ गुण मिळवून राज्यात पाचवा क्रमांक मिळवला.

नाशिक: (समर्थ गांवकरी)

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स कार्यक्रमात पोलीस आयुक्तालय गटात 'नाशिक जिल्हा – कायद्याचा बालेकिल्ला' उपक्रम राबविणाऱ्या नाशिक पोलीस आयुक्त कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांचा गौरव करण्यात आला. यावेळी माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी १५० दिवसांचा कृती आराखड्याबाबत शासकीय कार्यालयांमध्ये ई – प्रशासन सुधारणा आणण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १५० दिवसांचा ई प्रशासन सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई कार्यालय, कार्यालयाचा 'डॅश बोर्ड', 'व्हॉटस अॅप', 'चॅटबॉट', कृत्रिम बुद्धिमत्ता व 'ब्लॉक चेन'चा वापर आणि भौगोलिक माहिती प्रणाली या सात घटकांवर सहभागी कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले होते. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे करण्यात आले होते. त्यात 'नाशिक जिल्हा- कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम' राबविणाऱ्या नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयाने सर्वाधिक १५६.२५ गुण मिळवून पोलिस आयुक्तालय गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या नेतृत्वाखाली नाशिक पोलीस आयुक्तालयाने डिजिटल उपक्रम राबविले. नागरिकांशी थेट संवादाचे उपक्रम राबविले. यामध्ये 'ई मीट वीथ सीपी', 'वॉक इन टूर', नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य आदींचा समावेश आहे.

# केसरकर यांची सारवासारव

मुंबई : (समर्थ गांवकरी)

सिन्नर एमआयडीसीच्या कार्यालयात माजी शालेय मंत्री दीपक केसरकर आणि रुपाली चाकणकर यांचा संबध काय? केसरकर एमआयडीसीत शाळा बांधणार होते का? केसरकर आणि चाकणकर यांचा मोबाईल कॉल रेकॉर्ड तपासा. त्यांच्या आर्थिक स्तोत्राची तपासणी करा, या शिवसेना ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्या आरोपांवर केसरकर यांनी सारवासारव केली. खरात याने सुंदर मंदिर बांधले आहे. अशी स्तुतीसुमने उधळत कोणी बोलविल्यावर जाणे हे कर्तव्य आहे मात्र त्याच्या कृत्यात सहभागी नाही, असे स्पष्टीकरण केसरकर यांनी दिले. नाशिकचा भोंदू बाबा अशोक खरात यांच्या आश्रमात मंत्रीमंडळातील अनेक मंत्री व आमदारांनी हजेरी लावली असल्याचे उघडीस येत आहे. अनेक मंत्री, आमदारांचे खरात बरोबर आर्थिक संबध



असल्याची चर्चा आहे.अंधारे यांनी विशेष चौकशी पथकाच्या प्रमुख तेजस्विनी सातपते यांची भेट घेतली. नाशिक एमआयडीसी कार्यालयात केसरकर यांनी घेतलेल्या बैठकीत चाकणकर व खरात होते. त्याची छायाचित्र अंधारे यांनी दाखवून एमआयडीसीत केसरकर चाकणकर यांचा संबध काय असा सवाल उपस्थित केला. केसरकर यांच्यावर त्यांनी गंभीर आरोप केले. अंधारे यांच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी केसरकर यांनी शिवसेना मुख्यालयात एक पत्रकार परिषद घेतली. खरात यांच्या कोणत्याही कृत्यात सहभागी नाही.

# कांदा दरात ५० टक्क्यांहून अधिक घसरण

नाशिक: (समर्थ गांवकरी)

राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या अभूतपूर्व आर्थिक संकटातून जात असून कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये दरात झालेल्या तीव्र घसरणीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या कांद्याला सरासरी केवळ ३०० ते ८०० रुपये प्रतिक्विंटल इतका कमी दर मिळत आहे. हा दर उत्पादन खर्चाच्या निम्म्याहूनही कमी आहे. कांदा दरातील घसरण थांबविण्यासाठी राज्य सरकारने तातडीने बाजार हस्तक्षेप योजना (एमआयएस) लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना यासंदर्भात ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठविले आहे. कांद्याचा उत्पादन खर्च दीड



हजार ते १८०० रुपये प्रति क्विंटल आहे. सध्या त्याचे दर निम्म्याहून कमी झाले आहेत. बाजारात मिळणाऱ्या दरात काढणी व वाहतूक खर्चदेखील भरून काढणे अशक्य झाले आहे. परिणामी, शेतकऱ्यांवर मातीमोल दराने विक्रीची वेळ आली असून अनेक ठिकाणी शेतकरी रस्त्यावर कांदा फेकण्याच्या मनस्थितीत पोहोचले असल्याकडे दिघोळे यांनी लक्ष वेधले.केंद्र सरकारची योजना उपलब्ध असताना आणि कांद्याचे दर उत्पादन खर्चाच्या निम्म्यापेक्षा खाली गेले असताना राज्य सरकारने अजूनही हस्तक्षेप का केला नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

# शाळा सुरू करण्याबाबत शिक्षण विभागाकडून मोठा बदल

## विदर्भासह राज्यभरातील शाळा एकाच दिवशी सुरू, २ मे पासून उन्हाळी सुटी



पुणे : (समर्थ गांवकरी)

राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या राज्यभरातील शाळांना उन्हाळी सुटी, पुढील शैक्षणिक वर्ष सुरू करण्याबाबतच्या सूचना शिक्षण संचालनालयाने दिल्या आहेत. त्यानुसार सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांना २ मेपासून उन्हाळी सुटी सुरू होणार असून, विदर्भासह सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा १५ जूनला सुरू करण्यात येणार आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबतच्या सूचना विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्हा परिषदांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. संपूर्ण राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता आणि सुसंगती आणण्यासाठी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. या अनुषंगाने राज्यातील राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची सन २०२६ ची उन्हाळी सुट्टी, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील राज्य मंडळाच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना २ मे पासून सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. राज्यातील इतर मंडळाच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरू असल्यास किंवा अशा शाळांमध्ये महत्वाचे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्यास, विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा.

### राज्यभरात समानता

विदर्भातील तापमान, उन्हामुळे गेल्यावर्षीपर्यंत तेथील शाळा उर्वरित राज्यातील शाळांपेक्षा साधारणपणे आठ ते दहा दिवस विलंबाने सुरू केल्या जात होत्या. मात्र, आता या वेळापत्रकात बदल करून राज्यभरात समानता निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. विदर्भातील शाळा उर्वरित राज्यातील शाळांप्रमाणेच १५ जूनला सुरू होणार आहेत. केवळ तेथे सकाळच्या सत्रात शाळा भरवण्याची सवलत देण्यात आली आहे, असे गोसावी यांनी सांगितले.

# चाकणकरांच्या जागेवर माजी महापौर इच्छुक?

## राजलक्ष्मी भोसले या पुणे महापालिकेच्या माजी महापौर

पुणे : (समर्थ गांवकरी)

भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदावरूनही त्यांना पायउतार व्हावे लागले आहे. या पदावर राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या कोणाची नेमणूक करणार, याबाबत उत्सुकता असणार आहे. या पदासाठी पुण्यातून माजी महापौर राजलक्ष्मी भोसले या इच्छुक असल्याची चर्चा सुरू झाली आहे. राजलक्ष्मी भोसले या पुणे महापालिकेच्या माजी महापौर असून, हडपसर विधानसभा मतदार संघ हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे. सध्या त्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत या पक्षाने ४० जणांची स्टार प्रचारक म्हणून नियुक्ती केली होती. त्यामध्ये राजलक्ष्मी भोसले यांचा समावेश होता.

भोसले यांच्याशिवाय चाकणकर, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, सुरेखा ठाकरे, प्रतिभा शिंदे आणि सना मलिक या सहा महिला पदाधिकारी



स्टार प्रचारक होत्या. त्यापैकी भोसले या प्रदेशाध्यक्ष पदासाठी इच्छुक असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. राजलक्ष्मी भोसले या २००७ ते २००९ या कालावधीत पुणे महापालिकेच्या महापौर होत्या. त्यांचे आजोबा गणपतराव नलावडे तब्बल ४२ वर्षे तत्कालीन पुणे नगरपालिका आणि नंतरच्या महापालिकेच्या राजकारणात होते. वडील हिराजी विधाते हे हडपसर भागातील प्रसिद्ध वकील आणि काँग्रेसचे कार्यकर्ते होते.

# महाराष्ट्रावर ३० मार्चपासून अवकाळी पावसाचे संकट

## गारपिटीचा इशारा, काढणीच्या हंगामात शेतकरी धास्तावला

नागपूर : (समर्थ गांवकरी)

राज्यात ३० मार्चपासून ढगाळ हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे. सोमवारी ३० मार्चला प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो. त्यामुळे याठिकाणी देखील वादळी पावसाची शक्यता नाकारता येत नाही असा अंदाज आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या 'एक्स' या



सोशल मीडियावरून ही माहिती शेअर केली आहे. सोमवार, ३० मार्चच्या तुलनेत मंगळवारी ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर बुधवार १ ते शनिवारी ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

मार्चच्या माध्यान्हत पडून गेलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झाले. आता पुन्हा एकदा हवामानाचे बदलणारे रूप शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी.

# मोफत हृदयरोग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

- शेकडो रुग्णांची तपासणी
- डॉ. श्रीकांत भोस्कर यांचा पुढाकार
- एसीजी, शुगर व बीपी तपासणी मोफत



**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**


मुदखेड येथील पचलींग हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत हृदयरोग निदान शिबिरास शहर व तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. श्रीकांत भोस्कर यांनी शेकडो रुग्णांची तपासणी करून त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. मुदखेडचे भूमिपुत्र असलेले आणि ग्लोबल हॉस्पिटलशी संलग्न असलेले डॉ. भोस्कर यांनी आपल्या जन्मभूमीप्रती असलेले सामाजिक ऋण लक्षात घेऊन या शिबिराचे आयोजन केले. "समाजाचे आपण काही देणे लागतो, या भावनेतून हे शिबिर आयोजित केले," असे त्यांनी सांगितले. डॉ. संदीप पचलींग यांच्या पुढाकाराने झालेल्या या शिबिरात छातीत दुखणे, दम लागणे, चक्कर येणे, घाम येणे, मळमळ, उलट्या अशा हृदयविकाराशी संबंधित लक्षणे असलेल्या रुग्णांची तपासणी करण्यात आली. तसेच शुगर (मधुमेह) आणि रक्तदाब (बीपी) यांसारख्या महत्त्वाच्या चाचण्या मोफत करण्यात आल्या.

या शिबिरात सुमारे २०० गरजू रुग्णांची एसीजी व शुगर तपासणी करण्यात आली असून त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासोबतच हृदयविकार टाळण्यासाठी आवश्यक जीवनशैलीतील बदलांविषयीही डॉक्टरांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संदीप पचलींग, डॉ. रेणुका पचलींग यांच्यासह हॉस्पिटलमधील कर्मचारी व शहरातील प्रतिष्ठित नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

# Ola Electric ची '#EndICEAge' मोहीम

- EV फक्त ₹४९,९९९ पासून
- ₹५० हजारांपर्यंत फायदे, 'सर्व्हिस ट्रस्ट' व 'बायबॅक' गॅरंटी; ऑफर ३१ मार्चपर्यंत




**बंगळुरू : (समर्थ गांवकरी)**

Ola Electric ने '#EndICEAge' ही नवी मोहीम सुरू करत इलेक्ट्रिक वाहनांना अधिक परवडणारे बनवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. कंपनीने आपल्या Gen 3 S1 X (2kWh) आणि Roadster X (2.5kWh) ही मॉडेल्स केवळ ₹४९,९९९ पासून उपलब्ध करून दिली असून संपूर्ण पोर्टफोलिओवर ₹५०,००० पर्यंतचे फायदे जाहीर केले आहेत. ही ऑफर ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध आहे. ग्राहकांचा विश्वास वाढवण्यासाठी कंपनीने 'सर्व्हिस ट्रस्ट गॅरंटी' सादर केली आहे. यानुसार सेवा देण्यात विलंब झाल्यास ग्राहकांना मोफत Ola कॅब व्हाउचर्स दिले जाणार आहेत. तसेच 'बायबॅक गॅरंटी' अंतर्गत वाहनाच्या भविष्यातील ६०% पर्यंत मूल्याची हमी देण्यात आली आहे. सर्व वाहनांवर ८ वर्षांची विस्तारित वॉरंटीही देण्यात येणार आहे. Ola Electric चे सीईओ भाविश अग्रवाल यांनी सांगितले की, वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेद्वारे अधिकाधिक भारतीय ग्राहकांना EV स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा कंपनीचा उद्देश आहे.

Ola च्या स्कूटर्समध्ये ३२० किमीपर्यंत रेंज, तर मोटरसायकलमध्ये ५०० किमीपर्यंत रेंज, ० ते ४० किमी वेग २.१ सेकंदात आणि १४१ किमी/तास कमाल वेग अशी प्रगत वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. MoveOS 5 मुळे सतत OTA अपडेट्सही मिळणार आहेत. कंपनीकडून S1 Pro, S1 X आणि Roadster X अशा विविध मॉडेल्सची विस्तृत श्रेणी बाजारात उपलब्ध असून, किफायतशीर किंमत आणि प्रगत तंत्रज्ञानामुळे EV बाजारात स्पर्धा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# असेंट मेडिटेकचा पुण्यात भव्य वितरक मेळावा

- भागीदारी अधिक मजबूत
- १८० वितरकांचा सहभाग; फ्लेमिंगो ब्रँडच्या विस्तारासाठी धोरणात्मक चर्चा




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

फ्लेमिंगो ब्रँडमागील असेंट मेडिटेक लिमिटेडने पुण्यात भव्य वितरक मेळावा आयोजित करत आपले वितरक नेटवर्क अधिक मजबूत करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. या मेळाव्यात प्रदेशभरातील सुमारे १८० वितरक सहभागी झाले होते. कार्यक्रमास संस्थापक वसीएमडी राजीव मिस्त्री, प्रेसिडेंट – सेल्स अँड मार्केटिंग विवेक भटनागर तसेच पश्चिम विभाग डीजीएम सचिन जोसाळकर उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीच्या भविष्यातील विस्तार आणि धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या मेळाव्यात पुणे व आसपासच्या बाजारपेठेत वितरण साखळी अधिक सक्षम करणे, ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवणे आणि आगामी आर्थिक वर्षासाठी नियोजन यावर भर देण्यात आला. फ्लेमिंगो ब्रँडने वेदना व्यवस्थापन, ऑर्थोपेडिक सपोर्ट आणि हेल्थकेअर उत्पादनांमध्ये आपले मजबूत स्थान निर्माण केले असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. कंपनीने आपल्या प्रमुख वितरकांचा विशेष सन्मान केला. विशेषतः नितीन डिस्ट्रीब्युटरचे राहुल भंडारी यांचा १३ वर्षांच्या सहकार्याबद्दल गौरव करण्यात आला. वितरकांशी असलेला विश्वास आणि दीर्घकालीन संबंध हीच कंपनीची खरी ताकद असल्याचे नेतृत्वाने नमूद केले. मजबूत नेटवर्क आणि स्पष्ट धोरणात्मक दृष्टीकोनाच्या जोरावर असेंट मेडिटेक पुणे बाजारपेठेत आणखी विस्तार करण्यास सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दौरा

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार 29 मार्च 2026 रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. रविवार 29 मार्च 2026 रोजी मुंबई विमानतळ येथून सायंकाळी 4.15 वा. विमानाने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. सायं. 5.15 वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व मोटारीने हिंगोली गेट नांदेडकडे प्रयाण. सायं. 5.30 वा. "शिवनेरी" शिवसेना पक्ष कार्यालयाचे उद्घाटन. स्थळ- हिंगोली गेट नांदेड. सायं. 6 वा. मोटारीने बैल बाजार मैदान लोहा जि. नांदेडकडे प्रयाण. सायं. 6.30 वा. राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व पक्ष प्रवेश सोहळा स्थळ- बैल बाजार मैदान लोहा जि. नांदेड. सायं. 7.30 वा. मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. रात्री 8 वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण करतील.

# चिंचोली (काशिद) येथे शेतकरी मेळावा व नागरी सत्कार

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील चिंचोली (काशिद) येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत कृषी विभाग,जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी मेळावा उत्साहात पार पडला.यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थेतनिवडून आल्याबद्दल पंचायत समिती सभापती कमला शेळकंदे, उपसभापती अमित ढोले व जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे यांचा ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. मेळाव्यात कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव येथील शास्त्रज्ञ वैभव शिंदे यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान,पीक व्यवस्थापन व उत्पादनवाढ याबाबत मार्गदर्शन केले.विशेषतःआंबा लागवड तंत्रज्ञान व संबंधित समस्यांवर सविस्तर माहिती दिली. चिंचोली ग्रामपंचायतीने अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवून तालुक्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. यामध्ये क्यूआर कोडद्वारे प्रत्येक घराला नेमप्लेट,घरपट्टी व पाणी पट्टीची ऑनलाइन वसुली (तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत), जलसंधारण, वृक्षलागवड, सुशासनयुक्त पंचायत, बालस्नेही पंचायत, महिला उपजीविका विकास व लोकसहभागातून ग्रामविकास या क्षेत्रांत उल्लेखनीय काम झाले.'राह फाउंडेशन'च्या माध्यमातून पाझर तलाव व माती नाला बांधाच्या खोली करण व मजबुतीकरणाची कामे सुरू असल्याची माहिती सरपंच खंडू काशिद यांनी दिली. सभापती कमला शेळकंदे यांनी गावाच्या विकासासाठी सहकार्याचे आश्वासन दिले. उपसभापती अमितराव ढोले यांनी शेतीविषयक प्रश्न सोडवण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचीमाहिती दिली,तर जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे यांनी वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी सहकार्याची ग्वाही दिली. मेळाव्यास परिसरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतकऱ्यांनी आधुनिक शेती पद्धती अवलंबण्याचा निर्धार व्यक्त केला. सदर मेळाव्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष चव्हाण,माजी संचालक उत्तम काशिद, समर्थ मराठा समाज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ काशिद,वडज गाव सरपंच सुनिल चव्हाण, चिंचोलीचे उपसरपंच इम्रान चौगुले,ग्रामपंचायत सदस्या फसाबाई वाजे,पोलिस मित्र नवनाथ ताजणे,तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्या साठी गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावर,सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर,कृषी अधिकारी डी. पी. रावते व विस्तार अधिकारी लक्ष्मण झांजे यांचे मार्गदर्शन लाभले. शेवटी ग्रामपंचायत अधिकारी अर्चनाताई केदारी यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.चिंचोली ग्रामपंचायतने डिजिटल सुशासन व विकास कामांतून इतरांसाठी आदर्श निर्माण केला आहे.

# राजीव गांधी महाविद्यालयात अतिथी व्याख्यान संपन्न

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**



मुदखेड राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभागातर्फे 'साहित्यिक संवेदना और समाज' या विषयावरती अतिथी व्याख्यान संपन्न झाले. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख विजय सिंग ठाकूर, प्रमुख अतिथी डॉ. भीमराव घोडगे व विशेष अतिथी डॉ. जाधव सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सुप्रिया निखाते हिच्या स्वरचित स्वागत गीताने झाली. याप्रसंगी अतिथी व्याख्याते म्हणून पीपल्स कॉलेज नांदेड येथील प्राध्यापक डॉ. भीमराव घोडगे यांनी 'साहित्यिक संवेदना तथा समाज' या विषयावरती विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या व्याख्यानात प्राचीन साहित्यातील रामायण, महाभारत यापासून ते मध्ययुगीन काळातील बिहारी, तुलसी, मीराबाई व आधुनिक काळातील निराला, प्रसाद, मृदुला गर्ग या व अशा अनेक साहित्यिक व साहित्यकृतींचा वेध घेतांना ते समाजासाठी अत्यंत अनमोल, दिशादर्शक व प्रेरणादायक आहे असे प्रतिपादन केले. ते पुढे म्हणाले की साठोत्तरी साहित्यातून दलित, स्त्री, शेतकरी, आदिवासी व किन्नर अशा विविध अस्मिता सामाजिक संवेदना जागवण्यास महत्वपूर्ण ठरल्या. आपल्या भाषेचं, संस्कृतीचं, श्रमाचं व मातीचं सौंदर्य ज्या साहित्यात उतरतं तेव्हा सामाजिक संवेदनशीलता वाढून प्रगतीकडे वाटचाल होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख विजय सिंह ठाकुर होते त्यांनी आपले विचार व्यक्त करताना असे प्रतिपादन केले की एकीकडे आज समाजातील चंगळवाद वाढताना दुसरीकडे साहित्यातून श्रद्धा,आशा, विश्वास, प्रेरणा ह्या समाजाला माणुसकी शिकवतात. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे प्रा.डॉ. लक्ष्मण कदम यांनी केले तर आभार डॉ.बालाजी जाधव यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ. राहुल धावारे डॉ. बालाजी जाधव, प्रा. सुलोचना माळवे, प्रा. नागेश कुराडे, प्रा.संतोष बिरादार इत्यादी प्राध्यापक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी यशस्वीतेसाठी हिंदी विभाग प्रमुख डॉ.विजयसिंह ठाकूर, डॉ.लक्ष्मण कदम व डॉ. शेख बुशरा यांनी परिश्रम घेतले.




# अर्धापूर येथे उद्या विराट हिंदू संमेलन

**अर्धापुर : (समर्थ गांवकरी)**

दि.२९मार्च रविवारी सायंकाळी ७वाजता श्री केशवराज नगर येथे होणाऱ्या विराट हिंदू संमेलना निमित्ताने भव्य कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला असून यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार सौ. स्वातीताई दापकेकर यांची किर्तन सेवा होणार असून , कीर्तना पूर्वी जगदीश तायडे किनवट यांचे संमेलनास मार्गदर्शन होणार आहे. तरी अर्धापूर शहरातील व तालुक्यातील सकल हिंदू समाजाने या विराट हिंदू संमेलना मध्ये सहभागी होऊन मार्गदर्शनाचा व कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

# नेवासा येथे आयोजित ईद मिलन कार्यक्रमाला सर्वधर्मीय बांधवांचा प्रतिसाद



**नेवासा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा येथे स्वर्गीय लोकनेते मारुतराव घुले पाटील पतसंस्थेचे उपाध्यक्ष महंमदभाई शेख टेलर यांच्या परिवाराच्या वतीने आयोजित ईद मिलन कार्यक्रमाला सर्वधर्मीय बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी झालेल्या ईद मिलन कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक महंमदभाई टेलर,फारूक शेख,रौफ शेख,वसीम शेख यांनी आलेल्या सर्वधर्मीय बांधवांचे स्वागत केले.यावेळी जेष्ठ नेते रामभाऊ जगताप,विजय गांधी, बाळासाहेब पाटील,संभाजीराव पवार,आम आदमी पार्टीचे स्टार प्रचारक अँड. संजय सुखदान,नगरसेवक जितेंद्र कु-हे,घुले पाटील पतसंस्थेचे व्यवस्थापक लक्ष्मण नाबदे यांनी याप्रसंगी ईद मिलन कार्यक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. भाई चारा वृद्धिंगत करण्यासाठी असे उपक्रम गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले यावेळी नगरसेवक स्वप्रील मापारी,अनिल शिंदे,युवा विधी तज्ञ अँड.अभिजित पाटील नगरसेवक संभाजी धोत्रे,राजू काळे,असिफभाई पठाण,मुक्तार शेख,डॉ.राहुल चव्हाण,जालिंदर गवळी,अरुण जाधव, अँड. फरदिन पठाण,अनिल बोरकर,राजेंद्र थावरे,व्यापारी अनिल नळकांडे,इम्रान शफीक यांच्यासह विविध क्षेत्रातील व्यापारी नागरिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे उद्योग क्षेत्रास भेट

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथील वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सह्याद्री फार्म्स पोस्ट हार्वेस्ट केअर लिमिटेड, कृष्णूर एमआयडीसी, नांदेड तसेच गोदावरी पार्टिकल बोर्ड इंडस्ट्रीज़ या नामांकित उद्योगांना शैक्षणिक भेट देऊन उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास केला. या भेटीचे व्यवस्थापन प्राध्यापक सारिका लहानकर यांनी केले होते व या भेटीत डॉ. ललीता यडपलवार, डॉ. अतिष राठोड, प्रा. सारिका लहानकर, प्रा. किरण वाघमारे, प्रा. माधवी पांडे, डॉ. एन. यू. माचेवाड, प्रा. एम. एम. पांडे, प्रा. रागिनी जयस्वाल यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

भेटीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. बी. फड, उपप्राचार्या डॉ. कल्पना कदम तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. शिवदत्त विभुते यांनी विशेष कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे व्यावसायिक ज्ञान वाढण्यासोबतच त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# लंके यांनी स्मारकाला विरोध केल्याने फुले प्रेमींच्या भावना दुखावल्या

## माळीवाडा वेस ही चारशे वर्षाच्या पारतंत्र्याची व गुलामगिरीची साक्ष देणारा निजामशाहीचा कलंक- बाळासाहेब भुजबळ

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**



दि. २७ जुलै २०२५ रोजी तात्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते माळीवाडा वेस स्मारकाचे भूमिपूजन संपन्न झाले आहे.क्रांतीज्योती महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक होण्याचे स्वप्न फुले प्रेमींनी पाहिले आहे.आठ महिन्यांचा कालावधी उलटला तरी देखील महात्मा फुले व सावित्रीबाई फुले पूर्णाकृती पुतळ्याचे काम सुरू न झाल्याने महात्मा फुले प्रेमींमध्ये मोठा असंतोष पसरलेला आहे.

स्मारक भव्य दिव्य व्हावे, यासाठी माळीवाडा परिसरात मोठी जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच नियोजित स्मारकाभोवती असलेली अतिक्रमणे महानगरपालिकेने काढावीत. यासाठी महानगरपालिकेला निवेदन देण्यात आले आहे.

महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीने माळीवाडा वेस पाडावी हा ठराव केलेला आहे.या ठरावाला विविध ज्ञाती समाज, नगर शहरातील गणेश मंडळे,ज्येष्ठ नागरिक संघ,तसेच शहरातील ५७ नगरसेवकांनी मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला आहे.

माननीय खासदार निलेश लंके यांनी स्मारकाचे रखडलेले काम सुरू होण्यासंदर्भात महापालिकेत कोणताही पाठपुरावा केलेला दिसत नाही.याउलट फुले दांपत्य समितीच्या "माळीवाडा वेस पाडावी" या ठरावाला विरोध करण्यासाठी खासदार निलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री माननीय गजेंद्र सिंह शेखावत यांना पत्र दिले आहे. माळीवाडा वेस पडू नये, महात्मा फुले यांच्या स्मारकाचे काम सुरू होऊ नये.यासाठी खासदार निलेश लंके प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. खासदार निलेश लंके यांनी शहराच्या विकासासाठी काय योगदान दिले आहे ते सांगावे. शहर विकासासाठी दिल्ली वारी करावी.चारशे वर्षाची गुलामगिरीची साक्ष असणारी माळीवाडा वेस जतन केल्यास भारतीयांच्या स्वाभिमानास ठेच पोचणार आहे.केवळ फुले प्रेमींना विरोध करण्यासाठी खासदार साहेबांचा अट्टाहास सुरू आहे.हेच दिसत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील फुले प्रेमींनी खासदार निलेश लंके यांचा जाहीर निषेध केलेला आहे.

यापुढील काळात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाला विरोध करणाऱ्यांना चोख उत्तर दिले जाईल. लोकप्रतिनिधींनी जनसामान्यांच्या भावनांचा विचार करावा.अन्यथा फुले प्रेमी मोठे जन आंदोलन उभारतील. असा इशारा ओबीसी व्हिजेऐनटी जनमोर्चचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी सांगितले आहे.

आपल्या देशावर दीडशे वर्ष राज्य करणाऱ्या इंग्रज राजवटीच्या खुणा पुसण्याचे काम भारतीयांनी केले आहे. देशभरात इंग्रज राजवटीशी संबंधित अनेक स्मारके, प्रतिमा आणि नामकरणे बदलण्याचे प्रयत्न झाले आहेत. याचा उद्देश स्वतःच्या इतिहास आणि संस्कृतीला महत्त्व देणे. व्हिक्टोरिया टर्मिनसचे नामकरण बदलून छत्रपती शिवाजी टर्मिनस करण्यात आले.इंग्रज राजवटीशी संबंधित अनेक प्रतिमा आणि स्मारके हटवण्यात आली आहेत.

चारशे वर्षांपूर्वी नगर शहरात निजामशाहीचे राज्य होते. माळीवाडा वेस ही निजामकालीन इतिहास सांगणारी पारतंत्र्याची व गुलामगिरीची जाणीव करून देणारी ही वेस पाडल्यास हिंदुद्वेषी निजामशाहीचा इतिहास पुसला जाईल. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पूर्णाकृती पुतळा पहिल्यांदाच अहिल्यानगर जिल्हा मध्ये होत असल्याने महात्मा फुले प्रेमींमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण दिसत आहे. नियोजित स्मारक भव्यदिव्य असे व्हावे.माळीवाडा चौकातून जाणाऱ्या पाचही रस्त्यावरून हे स्मारक दिसावे.शंभर वर्षाचा दृष्टिकोन ठेवून हे स्मारक होत असल्याने स्मारक भव्यदिव्य व्हावे.यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील महात्मा फुले प्रेमींनी फुले दांपत्य स्मारक समितीच्या माध्यमातून जिल्हा बैठक घेण्यात आली होती.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय-एमपीकेव्हीमध्ये डिजिटल कृषीसाठी सामंजस्य करार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर-मनमाड रस्त्यावरील विळद घाट येथे शेतकऱ्यांसाठी स्मार्ट आणि काटेकोर शेतीला चालना देण्यासाठी डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय (डीव्हीव्हीपी), अहिल्यानगर आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ (एमपीकेव्ही), राहुरी यांच्यात सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. हा करार कृषी क्षेत्रात एआय, मशीन लर्निंग, मेकॅनायझेशन, मेकॅट्रॉनिक्स यांचा वापर करून डिजिटल कृषी नवोन्मेषाला प्रोत्साहन देणार आहे.



या सहकार्यांतर्गत ड्रोनद्वारे पीक निरीक्षण, आयओटी आधारित शेती व्यवस्थापन, एआय आधारित निर्णय प्रणाली, संसाधन नकाशा तयार करणे, तसेच कृषी क्षेत्रातील अनेक नवीन उपक्रम व इतर विषयांवर संयुक्त संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जाणार आहेत. या MoU ची वैधता तीन वर्षांची असून, नंतर नूतनीकरण करण्याची तरतूद आहे.

या सामंजस्य कराराचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे क्षमता विकास हा आहे . दोन्ही संस्था संयुक्तपणे विद्यार्थी , प्राध्यापक आणि शेतकऱ्यांच्या क्षमता विकासासाठी विविध कार्यक्रम राबवणार आहेत. यात एआय, मशीन लर्निंग, ड्रोन तंत्रज्ञान, आयओटी-आधारित शेती व्यवस्थापन, मेकॅट्रॉनिक्स आणि स्मार्ट फार्मिंग यावर विशेष प्रशिक्षण कार्यशाळा, हँड्स-ऑन ट्रेनिंग, इंटर्नशिप आणि सर्टिफिकेट कोर्सेसचा समावेश असेल. या प्रसंगी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी चे सन्माननीय कुलगुरु डॉ.व्ही.के.खरचे अध्यक्षस्थानी होते.

अहिल्यानगर शहरातील सुमारे साडेचार दशकाची यशस्वी घोडदौड राबविणाऱ्या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय (डीव्हीव्हीपी) सोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे तयार होणारे तंत्रज्ञान व प्रणाली या राज्यातील शेतकरी कृषी शास्त्रज, कृषी आणि पारंपारिक अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व लोकांसाठी संयुक्तरीत्या उपयोगी ठरणार आहेत हे कुलगुरु महोदयांनी आपल्या भाषणात नमूद केले.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन चे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनील कल्हापुरे यांनी फौंडेशन अंतर्गत अभियांत्रिकी, कृषी, फार्मसी , मेडिकल व इतर शैक्षणिक संकुलांची, अभ्यासक्रमांची तसेच मागील साडेचार दशकांपासून जागतिक स्तरावर पोहोचलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा विषद केल्या. या कार्यक्रमासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला चे माजी कुलगुरू डॉ.व्ही. एम.मायंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा.सुनील कल्हापुरे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी चे संशोधन संचालक डॉ. पी.एस. बोडखे यांनी सामंजस्य करार (MoU) स्वाक्षरीत केला. प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ.एच.जी. मोरे आणि डॉ.सचिन नलावडे, सहयोगी अधिष्ठाता, कृषी अभियांत्रिकी, डॉ. सुनील कदम, विभागप्रमुख, कृषी अभियांत्रिकी, व डॉ.अजित लवारे, विभागप्रमुख, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, डॉ. ए.के. पाटील, विभागप्रमुख, इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन, डॉ.डी.ए. विधाते, विभागप्रमुख, आयटी, डॉ.कानिफ मरकड, सहयोगी प्राध्यापक, प्रा.एम.ए.तांबोळी, सहाय्यक प्राध्यापक, कॉम्प्युटर विभाग उपस्थित होते.

दोन्ही संस्थांमधील हे सहकार्य कृषी क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणेल आणि शेतकऱ्यांना फायदेशीर ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

सदर उपक्रमासाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील, संस्थेचे चेअरमन तथा राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.

# १५ संशयित आरोपींचे जामीन अर्ज नामंजूर

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केली दोन जणांना अटक

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

घातक क्रिमपासून बनावट दूधाची निर्मिती करून विक्री केल्याप्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात पसार असलेल्या १२ संशयित आणि अटकेतील तिघे अशा १५ जणांचा जामीन अर्ज श्रीगोंदा येथील सत्र न्यायालयाने नामंजूर केला आहे. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. अटक संशयितांची संख्या पाच झाली आहे. एलसीबी आणि अन्न व औषध प्रशासन यांनी संयुक्त कारवाई करत जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथे १४ फेब्रुवारी रोजी छापा टाकून बनावट दूध तयार करण्याचा धंदा उघडकीस आणला होता. पॅराफिन (मिनरल ऑइल), ९.५ नावाचे केमिकल, मिल्क क्रिम आणि पाणी यांचे मशीनव्दारे एकत्रित मिश्रण करून घातक क्रिमची निर्मिती केली जात होती. एक लीटर क्रिमपासून सुमारे २० लीटर बनावट दूध तयार करून ते विक्री केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात समीर कमरूद्दीन शेख (रा. उंबरे, ता. राहुरी), आफताब कलीम शेख (रा. शुक्लेश्वर चौक, राहुरी) व रामदास नवनाथ उबाळे (रा. फक्राबाद) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायलयीन कोठडीत आहे. त्यांनी जामिनासाठी श्रीगोंदा सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी पार पडली. न्यायालयाने तिघांचे जामीन अर्ज नामंजूर केले आहेत. दरम्यान, या बनावट दूध धंद्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी, श्रीरामपूर, नेवासा, जामखेड, श्रीगोंदा तालुक्यासह बीड, नाशिक जिल्ह्यातील सुमारे ३१ जणांचा सहभाग निष्पन्न झाला असून त्यांना दाखल गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. आरोपी झाल्यापासून ते पसार आहेत.

या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे. पोलीस उपनिरीक्षक समीर अभंग तपास करीत आहेत. त्यांनी किरणकुमार भास्कर रोहकले (रा. श्रीरामपूर) व अर्जुन हरीश्चंद्र जगदाळे (रा. नेवासा) यांना अटक केली आहे. त्यांना न्यायालयाने ३० मार्चपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच पसार असलेल्या संशयितांपैकी १२ जणांना अटकपूर्वसाठी न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर न्यायालयाने सुनावणी घेतली. त्या १२ संशयितांचे जामीन अर्ज नामंजूर करण्यात आले आहे.

# गोडाऊन फोडून तांब्याचे हांडे चोरी

**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर येथे व्यावसायिकाच्या गोडाऊन फोडून तांब्याचे हांडे चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत तीन महिलांना अटक केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेल्या हांड्यांपैकी १ लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचे ५५ तांब्याचे हांडे जप्त करण्यात आले आहेत.

आनंद हेमंत सासवडे (रा. महाजन आळी, जुन्नर) यांचा भांड्याचा व्यवसाय असून त्यांच्या गोडाऊनमधून २० मार्च २०२६ रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी एकूण ९० तांब्याचे हांडे चोरून नेल्याची तक्रार जुन्नर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती.

या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेमार्फत तपास सुरू असताना परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. त्यामध्ये काही महिला गोडाऊनमधून हांडे चोरी करताना दिसून आल्याने तपासाची दिशा स्पष्ट झाली.

# मनपाच्या प्रभाग कार्यालयांना गड-किल्ल्यांची नावे द्या

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

येथील महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालय व उपकार्यालयांना महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतीक असलेल्या गड-किल्ल्यांची नावे देण्यात यावीत, अशी मागणी माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे महासभेत निवेदनाद्वारे केली आहे.



## माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांची मागणी

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महानगरपालिकेचा कारभार हा प्रमुख चार प्रभाग समिती कार्यालये व विविध उपकार्यालयांच्या माध्यमातून चालवला जातो. या कार्यालयांना ऐतिहासिक गड-किल्ल्यांची नावे दिल्यास शहराची ओळख अधिक समृद्ध व वैशिष्ट्यपूर्ण होईल. महाराष्ट्राच्या इतिहासातील गड-किल्ले हे केवळ वास्तू नसून ते स्वाभिमान, शौर्य आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे हे किल्ले आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरतात. प्रभाग कार्यालयांना अशी नावे दिल्यास नागरिकांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण होईल तसेच नव्या पिढीला आपल्या परंपरेची जाणीव होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी खालीलप्रमाणे गड-किल्ल्यांची नावे सुचवली आहेत : प्रभाग समिती क्र. १ (सावेडी) – रायगड, प्रभाग समिती क्र. २ (जुनी मनपा कार्यालय) – शिवनेरी, प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट कार्यालय) – प्रतापगड, प्रभाग समिती क्र. ४ (बुरुडगाव कार्यालय) – सिंहगड, केडगाव उपकार्यालय – राजगड, नागापूर उपकार्यालय – तोरणागड महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालय व उपकार्यालयांना वरीलप्रमाणे गड-किल्ल्यांची नावे देण्याबाबत संबंधित विभागाला तात्काळ आदेश देण्यात यावेत, अशी मागणी माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी केली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, माजी सभागृह नेते रवींद्र बारस्कर, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, नगरसेवक करण कराळे, रेवनाथ पवार, नगरसेविका वंदना ताठे आदी उपस्थित होते.

# शेतकरी-सरकार दुवा म्हणून राष्ट्रवादी किसान सभा कार्य करणार

## प्रदेशअध्यक्ष वसंत मानकर : हिंगोलीत राष्ट्रवादी किसान सभेची शासकीय विश्रामगृह येथे बैठक संपन्न

**हिंगोली: (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी किसान सभा पदाधिकारी व शेतकरी संवाद मिळावा शनिवारी 28 मार्च रोजी सकाळी 11 वाजता शासकीय विश्रामगृह येथे पार पडला या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष एडवोकेट वसंत मानकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिल भाऊ पतंगे यांच्या उपस्थितीत व राष्ट्रवादी किसान सभा हिंगोली जिल्हाध्यक्ष वसंत मस्के यांच्या नेतृत्वाखाली आढावा बैठक पार पडली यावेळी राष्ट्रवादी किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष एडवोकेट वसंत मानकर यांनी किसान सभा ही संघटना राज्यात शेतकरी आणि सरकार त्यांच्यातील प्रभावी दुवा म्हणून कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



राष्ट्रवादी किसान सभेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष वसंत मानकर 13 मार्चपासून महाराष्ट्र दौऱ्यावर आहे ते हिंगोली येथे किसान सभेच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीने झाली. या बैठकीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या मानकर यांनी जाणून घेतल्या. या बैठकीत मार्गदर्शन करताना मनकर म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करून त्यावर शासनाच्या माध्यमातून उपाययोजना राबवण्यासाठी किसान सभा सक्रिय भूमिका बजावेल. शेतकरी व सरकार त्यांच्यात समन्वय साधत त्यांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य दिले बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष अनिल भाऊ पतंगे हे होते.

त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रवादी काँग्रेस हा शेतकऱ्यांचा पक्ष असून किसान सभेच्या माध्यमातून ही ओळख अधिक भक्कम करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक करताना किसान सभा हिंगोली जिल्हाध्यक्ष वसंत मस्के यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले. विशेषतः रानडुकराच्या हल्ल्यांमुळे शेतकरी हवालदिल होत असून, फक्त आर्थिक मदतीऐवजी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. जंगललगतच्या भागातील शेतकऱ्यांना ६ फूट उंचीचे सौर कुंपण १०० टक्के अनुदानावर देण्याचीही मागणी करण्यात आली.

तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना अंतर्गत अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वाहन चालविण्याचा परवाना असण्याची अट रद्द करून कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्याची मागणीही केली .

# बस स्थानकाची पथकाकडून पाहणी

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२६ अंतर्गत, आज दि. २६ मार्च रोजी मुदखेड बस स्थानकाची विशेष तपासणी पथकाद्वारे करण्यात आली. या मोहिमेमुळे बस स्थानक परिसरातील स्वच्छतेचा दर्जा उंचावण्यासाठी आणि प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी विशेष भर देण्यात येत आहे. या मोहिमेसाठी धाराशिव विभागाचे अजय पाटील विभाग नियंत्रक, प्रदीप सुतार कामगार अधिकारी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पथकाने स्थानकाला भेट दिली. यावेळी मुदखेड बस स्थानकाच्या वतीने आणि स्थानिक मान्यवरांच्या वाहतूक नियंत्रक निर्दोष पवार यांनी पथकाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी नांदेड बसस्थानक प्रमुख यासिन खान , ईश्वर पिन्नलवार सहसचिव, मराठी पत्रकार संघ , नांदेड जिल्हा, संजय गळगे, निर्दोष पवार वाहतूक नियंत्रक मुदखेड यांच्यासह अदी उपस्थित होते.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून रानमाळ उंचखडक मंदिरात दिनदर्शिका, घड्याळ व डायरी भेट!




**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील वारकरी संप्रदायातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या रानमाळ उंचखडक येथील मंदिरात दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने सरपंच बबनराव देशमुख यांना दिनदर्शिका, घड्याळ व डायरी भेट देण्यात आली. मंदिर परिसरात साध्या पण भक्तिमय वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते ही भेट प्रदान करण्यात आली. यावेळी मंदिराच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली तसेच वारकरी भाविकांसाठी मंदिर परिसरातील सुविधा वाढविण्याबाबतही संवाद झाला. कार्यक्रमास अक्षय आभाळे, हरीभाऊ फापाळे, खतोडे साहेब तसेच परिसरातील ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते. उपस्थितांनी मंदिराच्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांना सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.






# घरगुती वीज ग्राहकांना फायदा, वीजेची कुठलाही दरवाढ नाही

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**




महावितरणच्या २०२५-२६ ते २०२९-३० या पाच आर्थिक वर्षांच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आपला आदेश आज प्रसिद्ध केला आहे. महावितरणने (MSEB) पाच वर्षात वीजदर कपातीसाठी मांडलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठीचे वीजदर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने दरवर्षी कमी होणार आहेत. कोणत्याही प्रवर्गात वीजदर वाढणार नाहीत. महावितरणच्या याचिकेवर आयोगाने गेल्या वर्षी मार्च अखेरीस एक आदेश दिला होता. त्या आदेशाला स्थगिती देण्यात आली होती. महावितरणच्या पुनर्विचार याचिकेनुसार आयोगाने जून २०२५ मध्ये एक आदेश दिला होता. त्या आदेशाला काहीजणांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर बोट ठेऊन जूनचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयानेही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करून व तांत्रिक बाबी पूर्ण करून आदेश देण्याची सूचना नोव्हेंबरमध्ये केली होती. त्यानुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या पुनर्विचार याचिकेवर जनसुनावणी करून, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करून व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून आता आदेश दिला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले आहे. तसेच आता २०३० पर्यंतच्या वीजदराबाबत स्पष्टता आली आहे.

# १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमात ठाणे जिल्हा परिषद राज्यात तृतीय

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सीईओ रणजित यादव यांचा गौरव; डिजिटल प्रशासनात ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात ठाणे जिल्हा परिषदेनं राज्यात तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केलं आहे. या यशाबद्दल मुंबईतील सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांना प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं.



या कार्यक्रमात सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. डिजिटल प्रशासनाच्या माध्यमातून पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख सेवा देण्याच्या दिशेने सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे रणजित यादव यांनी सांगितले.

या मूल्यमापनात अधिकृत संकेतस्थळ, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफिस, डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, एआय व ब्लॉकचेन तसेच GIS वापर या सात निकषांवर जिल्हा परिषद ठाणेने उत्कृष्ट कामगिरी केली.

ई-ऑफिस प्रणालीमुळे प्रशासनात पारदर्शकता आणि वेग वाढला असून ३०४ कर्मचारी १०० टक्के डिजिटल पद्धतीने काम करत आहेत. १४ हजारांहून अधिक ई-फाइल्स आणि ३५ हजारांपेक्षा जास्त ई-रिसिप्ट्सची निर्मिती झाली आहे.

तक्रार निवारण पोर्टलद्वारे ९९ टक्के तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यात आले असून नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

घरपोच सेवा उपक्रमामुळे नागरिकांना शासकीय सेवा थेट घरी मिळत आहेत. तसेच रिअल-टाइम डॅशबोर्डमुळे निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान झाली आहे.

एआयच्या साहाय्याने आरोग्य व प्रशासनातील कामकाज सुलभ झाले असून ब्लॉकचेनमुळे नोंदी अधिक सुरक्षित झाल्या आहेत. GIS तंत्रज्ञानामुळे विकास आराखडे अधिक वैज्ञानिक पद्धतीने तयार केले जात आहेत.

या यशामागे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, प्रमोद काळे यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचा मोठा वाटा असल्याचे नमूद करण्यात आले.

ठाणे जिल्हा परिषद डिजिटल प्रशासनाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून, ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून नागरिकांना अधिक सक्षम, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा आदर्श निर्माण करत आहे.

# दिव्यात गॅस सिलेंडरसाठी उघड लूट; मनसेचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



दिवा शहरात घरगुती गॅस सिलेंडर वितरणामध्ये मोठा घोटाळा सुरू असल्याचे समोर आले आहे. नागरिकांनी गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर त्यांना कंपनीकडून "सिलेंडर डिलिव्हर झाल्याचा" मेसेज पाठवला जात आहे. मात्र प्रत्यक्षात ८ ते १० दिवस सिलेंडर दिला जात नाही. त्यानंतर डिलिव्हरी बॉय किंवा संबंधित गॅस एजन्सीकडून नागरिकांना पुन्हा नवीन सिलेंडर बुक करण्यास सांगितले जात आहे. हा प्रकार म्हणजे सरळसरळ नागरिकांची फसवणूक असून न दिलेले सिलेंडर काळाबाजारात विकले जात असल्याचा गंभीर संशय आहे.

सध्या देशात सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याचे सांगितले जात असताना दिवा शहरातील काही गॅस एजन्सी नागरिकांची उघडपणे लूट करत आहेत. अनेक कुटुंबांना ८-१० दिवस गॅस मिळत नसल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतहा भारत गॅस कंपनीच्या काही एजन्सींबाबत या संदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी समोर येत आहेत. प्रकरणी प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहरातील नागरिकांच्या या प्रश्नावर संबंधित गॅस एजन्सींवर तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करावी, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावे व गॅस वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणून नागरिकांना वेळेवर सिलेंडर उपलब्ध करून देऊन काळाबाजार करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना दिवा मनसेने पत्र पाठविले असून कारवाई न झाल्यास आंदोलन करण्यात येईल असेल मनसे दिवा शहर सचिव प्रशांत गावडे यांनी स्पष्ट केले आहे.



नाशिक : छावा भारत क्रांती मिशन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलास भाऊ पांगारकर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा श्री शिवेंद्रराजे भोसले हे नाशिक दौऱ्यावर आले असता. त्यांचे शासकीय विश्राम गृह येथे स्वागत करत हिंदू धर्मयोद्धा सुरेश चव्हाणके लिखित कैसे बने इस्लामिक राष्ट्र हे पुस्तक भेट दिले. यावेळी १४ मै २०२६ रोजी आग्रा येथे आयोजित छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. या संदर्भाची माहिती देण्यात आली. यावेळी विवेक चौधरी, वृषाली चौधरी, पत्रकार अमोल सोनवणे , अतुल पांगारकर उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...




### विरमहाराज मंदिर, पिंपळगाव खांड येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा!

अकोले (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील पिंपळगाव खांड येथे श्री क्षेत्र विरमहाराज मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा त्रिदिनी धार्मिक सोहळा मंगळवार दि. ३१ मार्च ते गुरुवार दि. २ एप्रिल २०२६ दरम्यान विविध विधींसह संपन्न होणार आहे. कार्यक्रमांतर्गत मांडव डहाळे, मूर्तीची भव्य मिरवणूक, गणेशपूजन, पुण्याहवाचन, मंडपपूजन, जलनिवास, विविध मंडल स्थापना, नवग्रह हवन, धान्य निवास, स्थापित देवतांचे पूजन, महाअभिषेक, देवता हवन, मूर्ती स्थापना, बलीपूजन, वसोधीरा पूर्णाहुती व कलशारोहण असे विधी पार पडणार आहेत. कलशारोहण सोहळा ह.भ.प. अणनाथ गिरी महाराज (अडबंगनाथ संस्थान, भामाठाण) व प.पू. देवानंद महाराज (मौनगिरी बाबा) यांच्या शुभहस्ते होणार असून प्रधान आचार्य गोविंद हरदास गुरुजी यांच्यासह ब्रह्मवृंद मार्गदर्शन करणार आहेत. या निमित्त त्रिदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), ह.भ.प. किरण महाराज शेटे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. दररोज पहाटे काकडा आरती, हरिपाठ, हरिकीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यात भव्य मिरवणूक, दिंडी, भजन-कीर्तन कार्यक्रम तसेच पंचक्रोशीतील भजनी मंडळांचा सहभाग राहणार आहे. या कार्यक्रमासाठी समस्त ग्रामस्थ पिंपळगाव खांड, शेरेवाडी, ढगेवाडी, शिदवड तसेच पंचक्रोशीतील भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जुन्नरच्या आदिवासी दुर्गम भागात शेतात गांजाची लागवड; आरोपीला अटक!

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागात एका शेतकऱ्याच्या शेतात बेकायदेशीर गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. दिनकर विठ्ठल डामसे (वय ६३, रा. वाघेवाडी, इंगळून) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. जुन्नर पोलीस ठाण्यातील पोलीस शिपाई अजित घमाजी गेंगजे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीच्या स्वतःच्या शेतात गांजा या अमली पदार्थाची बेकायदेशीर लागवड केल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी शेतात लहान-मोठी मिळून ८२ गांजाची झाडे आढळून आली. जप्त केलेल्या झाडांचे एकूण वजन ६.४४५ किलो इतके असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अंतर्गत कलम २० (ब) (ii) (A), ८ (ब), ८ (क) प्रमाणे जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीवर यापूर्वीही आयपीसी कलम १४३, १४७, १४९, ३२३, ५०४ व ५०६ अंतर्गत गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे दुर्गम भागात बेकायदेशीर गांजाच्या लागवडीवर आळा बसेल, अशी चर्चा परिसरात सुरू आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गटकुळ करीत आहेत.



### घरगुती वादातून पत्नीची निर्घृण हत्या; पडघा पोलिसांकडून पती अटकेत

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पती-पत्नीतील सततच्या घरगुती वादातून पतीने पत्नीची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पडघा पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून न्यायालयाने ३० मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. निर्मला गोरखनाथ वाघे (वय २७) असे मृत महिलेचे नाव असून त्या भिवंडी तालुक्यातील वाहुली, कासपाडा येथेवास्तव्यास होत्या. तर गोरखनाथ अंकुश वाघे (वय २५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपी पतीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती-पत्नीमध्ये नेहमीच घरगुती कारणांवरून वाद होत असत. या वादाचा राग मनात धरून आरोपीने पत्नीचा काटा काढण्याचा कट रचला. दिनांक २७ मार्च २०२६ रोजी आरोपीने पत्नी निर्मला हिला मोटारसायकलवरून फिरायला नेण्याचा बहाणा करून पडघा जवळील कांदळी परिसरातील कोंकणकट्टा हॉटेलच्या अलीकडे असलेल्या डोंगराळ व निर्जन ठिकाणी नेले. तेथे एकांत साधून आरोपीने पत्नीच्या अंगावरील ओढणीने तिचा गळा आवळून निर्घृण हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच पडघा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला व आरोपीला ताब्यात घेतले. दरम्यान, पडघा पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता ३० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून अधिक तपास पडघा पोलीस करीत आहेत.

# नितीन गडकरी दि. १० एप्रिलला तुकाराम महाराज पालखी मार्गाची पाहणी करणार- हर्षवर्धन पाटील

**हर्षवर्धन पाटील यांची विनंती केली मान्य : नागपूर येथे नितीन गडकरी-हर्षवर्धन पाटील चर्चा**

**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**



संत श्री तुकाराम महाराज पालखी मार्गा (राष्ट्रीय महामार्ग 965 जी ) ची आपण स्वतः येऊन पाहणी करून आढावा घ्यावा, अशी विनंती केंद्रीय रस्ते, परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना नागपूर येथे भेटीत आज शनिवारी (दि. 28) केली. त्यास तात्काळ होकार देत ना.नितीन गडकरी हे पुढील महिन्यामध्ये दि. 10 एप्रिल रोजी संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची पाहणी करणेसाठी येणार आहेत, अशी माहिती माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी दिली. नागपूर येथे ना.नितीन गडकरी यांची हर्षवर्धन पाटील यांनी भेट घेऊन संत तुकाराम महाराज पालखी मार्गाच्या अपूर्ण व व निकृष्ट कामांबद्दल चर्चा केली. यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी नितीन गडकरी यांचेकडे पालखी मार्गावरील ठिकठिकाणीचे उड्डाणपूल, भुयारी मार्ग, बाह्य वळण मार्ग, इंदापूर ते माळीनगर पालखी मार्ग रस्ता यांची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. देहू ते पंढरपूर पालखी मार्गावरील जंक्शन उड्डालपूल, गोतोंडी उड्डाणपूल, निमगाव केतकी बायपास, वडापुरी उड्डाणपूल, वकीलवस्ती भुयारी मार्ग, बावडा बाह्यवळण रस्ता ही अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करणे तसेच इस्टिमेट प्रमाणे वृक्षारोपण, झाडे, रस्ता दुभाजकांची कामे, स्ट्रीट लाईट, दिशादर्शक फलक आदी कामे ठीकठिकाणी झालेली नाहीत. तसेच अनेक ठिकाणी गटारीची कामे झालेली नसल्याने अथवा अपूर्ण असल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सदर कामे इस्टिमेट प्रमाणे कामे पूर्ण करण्यात यावीत तसेच कामे अपूर्ण असताना सुरू असलेली टोल वसुली आदी अनेक विषयांवर यावेळी हर्षवर्धन पाटील यांची नितीन गडकरी यांचेशी चर्चा झाली. यावेळी ना.नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून पालखी मार्गाची कामे तातडीने पूर्ण करणे संदर्भात आदेश दिले तसेच कामे अपूर्ण असताना टोल कसा काय लावला या संदर्भातही अधिकाऱ्यांकडे विचारणा केली. दरम्यान, या भेटीत नितीन गडकरी यांचेशी हर्षवर्धन पाटील यांची इथेनॉल यासंदर्भातही चर्चा झाली.

# पुनद खोऱ्यातील आदिवासींची आक्रोशपूर्ण हाक!

**कळवण : (समर्थ गांवकरी)**

विकासाच्या गाजावाज्यात ग्रामीण भागातील वास्तव किती भयावह आहे, याचे जिवंत उदाहरण सध्या पुनद खोऱ्यात पाहायला मिळत आहे. एका बाजूला स्वर्गीय ए. टी. पवार यांच्या पुढाकारातून उभारलेले धरण पाण्याने भरलेले उभे आहे, तर दुसऱ्या बाजूला त्याच धरणाच्या सावलीत जगणारा आदिवासी शेतकरी पाण्याच्या एका थेंबासाठी हतबल झालेला आहे.

खडकीसह सुपला, काठरा, निमपाडा, जयदर, भोयेपाडा, शेरी, भैताणे, सुळे, बोरपाडा, सावरपाडा, पिंपळा खुर्द आणि पिंपळे बुद्रुक या गावांतील शेतकरी आज अक्षरशः हवालदिल झाले आहेत. आशेने पेरलेली पिके उन्हाच्या तडाख्यात करपून जात आहेत. कर्ज काढून, जीवाचे रान करून उभे केलेले पीक डोळ्यांसमोर मरताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

शेतकऱ्यांच्या मनातील संताप आता उघडपणे व्यक्त होऊ लागला आहे. “धरण आमच्या भागात, पण पाणी आमच्याच शेतात नाही—हा कसला विकास?” असा थेट सवाल प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना विचारला जात आहे.

पुनद खोऱ्यातील शेती हीच येथील जीवनरेखा आहे. पिके नष्ट झाली तर केवळ आर्थिक नुकसान नाही, तर हजारो कुटुंबांवर उपासमारीचे संकट कोसळणार आहे. जनावरांचे चारा, घरातील अन्न, मुलांचे शिक्षण—सगळं काही या पिकांवरच अवलंबून आहे. धरणात पाणी असतानाही वेळेवर पाणी न सोडणे, ही केवळ चूक नाही तर शेतकऱ्यांवरचा अन्याय असल्याची भावना तीव्र होत आहे.

# वृत्तपत्रांना १५०% जाहिरात दरवाढीची मागणी

- व्हॉईस ऑफ मीडिया नांदेडचे मुख्यमंत्र्यांना निवेदन
- लघु-मध्यम वृत्तपत्रांच्या अस्तित्वाचा प्रश्न
- जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सरकारकडे सादर



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील वृत्तपत्र उद्योग गंभीर आर्थिक संकटातून जात असल्याच्या पार्श्वभूमीवर शासकीय जाहिरात दरात किमान १५० टक्के वाढ करावी, या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांचे निवेदन व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघ, जिल्हा शाखा नांदेडच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करण्यात आले. हे निवेदन २७ मार्च रोजी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या मार्फत देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वृत्तपत्र उद्योग हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. मात्र २०१९ पासून कागद, मुद्रण साहित्य, वीज आणि इतर खर्चात तब्बल १५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. याउलट शासकीय जाहिरात दरात अपेक्षित वाढ न झाल्याने विशेषतः लघु व मध्यम वृत्तपत्रांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, वृत्तपत्र उद्योग कमकुवत झाल्यास जनतेच्या माहितीच्या अधिकारावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे, सचिव अनिल पाटील धमणे, एस. एम. मुदखेडकर यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# १५० दिवसांचा ई गव्हर्नन्स उपक्रम

- नाशिक जिल्हा-कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम राबविणारे नाशिक पोलिस आयुक्तालय राज्यात प्रथम
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांचा गौरव

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स कार्यक्रमात पोलिस आयुक्तालय गटात ‘नाशिक जिल्हा - कायद्याचा बालेकिल्ला’ उपक्रम राबविणाऱ्या नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांचा गौरव करण्यात आला. यावेळी माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते आदी उपस्थित होते.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५० दिवसांचा कृती आराखड्याबाबत शासकीय कार्यालयांमध्ये ई – प्रशासन सुधारणा आणण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १५० दिवसांचा ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमात कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई ऑफिस, कार्यालयाचा डॅश बोर्ड, व्हॉटस ॲप, चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता व ब्लॉक चेनचा वापर आणि भौगोलिक माहिती प्रणाली या सात घटकांवर सहभागी कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले होते. 150 दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे (Quality Council of India) करण्यात आले होते. त्यात ‘नाशिक जिल्हा- कायद्याचा बालेकिल्ला उपक्रम’ राबविणाऱ्या नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयाने सर्वाधिक 156.25 गुण मिळवून पोलिस आयुक्तालय गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला होता.

नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली पोलीस आयुक्त कार्यालयाने डिजिटल उपक्रम राबविले. नागरिकांशी थेट संवादाचे उपक्रम राबविले. त्यासाठी ई मीट वीथ सीपी, वॉक इन टूर, नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य असे विविध उपक्रम राबविले. यामुळे पोलिस दलाच्या कामकाजात पारदर्शकता, गतिमानता येऊन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला.

> राज्य शासनाने दिलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमात नाशिक पोलिस दलाने प्रभावी कामगिरी बजावली. त्यामुळे राज्यात प्रथम क्रमांक मिळाला. नागरिकांच्या सुरक्षेसाठी नाशिक पोलिस आयुक्तालय सदैव तत्पर आहे.
> **-संदीप कर्णिक,**
> **पोलिस आयुक्त, नाशिक**

# ‘एसएमबीटी’ सेवाभावी संस्थेला जागतिक 'ग्रेट प्लेस टू वर्क' मानांकन

## वैद्यकीय शिक्षण संकुलात असे मानांकन मिळवणारी महाराष्ट्रातील एकमेव संस्था – एसएमबीटी

**नंदी हिल्स (समर्थ गांवकरी)**



जागतिक स्तरावर आपण जिथे काम करतो त्या ठिकाणी कार्य संस्कृतीचे मूल्यांकन करणाऱ्या प्रतिष्ठित ‘ग्रेट प्लेस टू वर्क’ (Great Place to Work®) या संस्थेकडून एसएमबीटीला 'काम करण्यासाठी उत्तम ठिकाण' (Certified - Great Place to Work) म्हणून अधिकृतपणे प्रमाणित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील वैद्यकीय महाविद्यालय आणि आरोग्य संस्थांच्या श्रेणीत असा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळवणारी 'एसएमबीटी' राज्यातील पहिलीच संस्था ठरली आहे. हे प्रमाणपत्र म्हणजे संस्थेतील उत्कृष्ट कार्य संस्कृती, मानवी मूल्ये आणि प्रगतीशील वातावरणावर पडलेली जागतिक मोहोर मानली जात आहे.

'ग्रेट प्लेस टू वर्क' ही संस्था जगभरातील कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि आरोग्यसंस्था यांच्या कार्यसंस्कृतीचे (Workplace Culture) अत्यंत बारकाईने मूल्यांकन करते. एखाद्या संस्थेमध्ये कर्मचारी खरोखर समाधानी आहेत का, त्यांना कामाच्या ठिकाणी सन्मान मिळतो का, आणि व्यवस्थापनाबद्दल त्यांच्या मनात विश्वास आहे का, या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी एक सर्व्हेक्षण प्रक्रिया राबवली जाते. एसएमबीटीने ही प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे. यात प्रामुख्याने 'द ग्रेट प्लेस टू वर्क ट्रस्ट इंडेक्स सर्वेक्षण' आणि 'कल्चर ऑडिट' या दोन महत्त्वाच्या चाचण्यांचा समावेश होता. या सर्वेक्षणात संस्थेतील डॉक्टर, प्राध्यापक, परिचारिका आणि प्रशासकीय सहकाऱ्यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला, ज्याच्या आधारे मार्च २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीसाठी हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

गेल्या काही वर्षांमध्ये एसएमबीटीने आपला विस्तार अनेक पटींनी वाढवला आहे. केवळ पायाभूत सुविधाच नव्हे, तर टीमचा आकार आणि कर्मचारी संख्या वाढवून लोकांपर्यंत पोहोचण्यात ही संस्था यशस्वी ठरली आहे. विविधतेचा आदर करणे आणि कर्मचाऱ्यांना समान संधी देणे ही संस्थेची मुख्य सूत्रे राहिली आहेत. शारीरिक, मानसिक आणि भावनिक घटकांचे मूल्यांकन करून जे वातावरण तयार केले जाते, त्यामध्ये एसएमबीटीने बाजी मारली आहे. संस्थेतील पारदर्शकता आणि सातत्याने शिकण्याची संस्कृती यामुळेच आज आंतरराष्ट्रीय स्तरावर याची दखल घेतली गेली आहे. या गौरवास्पद क्षणाचे साक्षीदार होताना संस्थेचे चीफ पिपल ऑफिसर डॉ. महेश गाभणे म्हणाले, आम्ही हे प्रमाणपत्र मिळवून सन्मानित आहोत. कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिल्यास केवळ संस्थाच नाही, तर तिथली कार्यसंस्कृती देखील उंचावते हे यातून सिद्ध झाले आहे. कामगिरीतील सातत्य, वाढ आणि योग्य कौतुक या त्रिसूत्रीवर आमचा विश्वास आहे. या यशामुळे आम्हाला अधिक आत्मविश्वासाने आणि दृढनिश्चयाने आमच्या ध्येयाकडे कूच करण्याची ऊर्जा मिळाली आहे. सेन्ट्रल एचआर विभागप्रमुख सिताराम दिघे, मच्छिंद्र वाळूंज, किरण पाटील, सोनाली पाटील, बाळासाहेब काळे, मनीषा देशमुख व अश्विनी भगत यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)